# THE ON DEMAND EXAMINATION SYSTEM (ODES) ऑन डिमांड परीक्षा

डॉ. संजय पुरुषोत्तम शेडमाके,
सहयोगी प्राध्यापक
पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एडुकेशन,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई

**प्रस्तावना**

मार्च आणि एप्रिल म्हणजे शाळा, महाविद्यालयांच्या परीक्षांचे महिने. सगळीकडे शांत, गंभीर वातावरण. शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींची संध्याकाळची खेळाची वेळ अभ्यासाने घेतलेली असते, तर महाविद्यालयीन विद्यार्थी एकमेकांकडून नोट्स झेरॉक्स करण्यात मग्न असतात. हल्ली व्हॉट्स ऍप्पमुळे ग्रुपवर नोस्ट्स ची छायाचित्र पाठवली की त्यांचे काम झाले मग डोळे मोठे करून काय वाचतात तेच जाणतात .हो यामुळे झेरॉक्सचे पैसा वाचविण्याचे समाधान मात्र आहेच . सगळ्यांना अभ्यासक्रमावर किंवा अभ्यासक्रमाशिवाय आयत्या नोट्स मिळतात इतकी भाग्यवान मागची पिढी नव्हती. परीक्षा म्हटल्यावर सगळीकडेच गंभीर, टेन्शनचं वातावरण बघायला मिळतं.

परीक्षा केंद्रित पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या डोक्यात माहिती कोंबणे म्हणजेच 'शिकवणे' व ती माहिती जशीच्या तशी परीक्षेमध्ये उतरवणे म्हणजे ज्ञानप्राप्ती झाल्याचे प्रमाण असे म्हणावे लागेल.विद्यार्थी वर्षभर अभ्यास करतात हो घोकंपट्टी करतात असे म्हटले तरी चालेल पण ते वर्षभर करतात व हे ज्ञान किंवा हि माहिती तीन तासाच्या अवधीत लिहून काढतात दुसरी मजा तर वेगळीच आहे ती म्हणजे ती किती वेळात शिक्षक तपासतात हे होय . आपल्या शिक्षण पद्धतीत विधाने, व्याख्या, नियम यांची घोकंपट्टी करून पेपर लिहिणे .स्मरणशक्तीच्या जोरावर जर परीक्षेत विद्यार्थी गुण मिळवत असतील तर त्यांना आपल्याकडे हुशार मानण्यात येते व इतर विद्यार्थी सर्वसाधारण अथवा 'ढ' म्हणून संबोधले जातात. Every child is special ही आमिर खानची संकल्पना आपल्या प्रचलित परीक्षा केंद्रित पद्धतीमध्ये कोठेच सामाविष्ट झालेली दिसत नाही . चाकोरीबद्ध व शिस्तीच्या बडग्याखालची व परीक्षाकेंद्रित पद्धत विद्यार्थ्यांची खरी जिज्ञासा वाढवते का ? हा प्रश्न आपण समोर आ वासून उभा आहेच. विद्यार्थ्यांची परीक्षा देण्याची तयारी झाली काय? हे कुठेच आजच्या परीक्षा पद्धतीत बघितल्याचे ऐकीव नाही. प्रत्येक बोर्ड,विद्यापीठ आपले वेळापत्रक जाहीर करते व त्या प्रमाणे चाकोरीबद्द परीक्षा पार पडते व विशिष्ट वेळेत निकाल लावून लायक कि नालायक विद्यार्थी ठरविले जाते आणि याचीच धास्ती विद्यार्थ्यांनी घेतलेली दिसते. परीक्षा पद्धती बाबत बोलायचे झाल्यास पुण्याच्या एका मुलीने सीईटी मधे कमी मार्क मिळाले म्हणून आत्महत्या केली. खार म्हणजे दर वर्षी इंजिनिअरींगच्या बऱ्याच जागा रिकाम्या असतात, तिला

कितीही जरी कमी मार्क मिळाले असले तरीही त्या मुलीला कुठेतरी ऍडमिशन नक्की मिळालीच असती, पण असे असतांनाही तिने आत्महत्या का केली असेल? हा विचार जेंव्हा मनात येतो , तेंव्हा आपल्या परीक्षा पध्दतितला फोलपणा जाणवतो. मुलांच्या १२वी च्या परीक्षा झाल्या की पालकांच्या डोक्यावरचे ओझे कमी झाल्याचे समाधान होते. विद्यार्थ्याची दहावी आली की त्याच्या सोबतच घरच्या सगळयांचाच अभ्यास सुरु असतो. पण ताणतणावाचे घरचे वातावरण सुरु होतो तो १२वी नंतर.

सरकारच्या नवीन धोरणांनुसार शिक्षण पध्दतीत्त अमुलाग्र बदल करण्यात येत आहेत. सतत नवीन प्रयोग चालू आहेत. परीक्षांचे स्वरूप बदलले आहे.आठ्वीपर्यंत ओपन बूक टेस्ट आणि नववीला एकदम दिल्ली बोर्डाचा अभ्यासक्रम. सर्वंकश मूल्यमापन करताना, विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी केल्याचा दावा करण्यात आला होता मात्र प्रत्यक्षात कोणत्याच पालकाच्या मुलाचे दप्तराचे वजन कमी झाले नाही. नवीन धोरणानुसार अभ्यासाच्या बरोबरीने उपक्रम, प्रकल्प, ग्रुहपाठ, वर्गपाठ अशा प्रकारे प्रत्येक विषयाचे लिखाण पूर्ण करताना मुलगा कारकुन झाला यात शंका नाही.

आज अस्तित्वात असलेल्या परीक्षा पद्धतीत बऱ्याच प्रमाणात बदल झाले पाहिजे व ते आवश्यक आहे मात्र आपल्याकडील सामाजिक आणि कायदेशीर परिस्थितीमुळे इच्छा प्रगत करण्यापेक्षा काहीही होऊ शकत नाही - हे सुद्धा कडू सत्य आहे.

1. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी अभ्यासक्रम सुधारले पाहिजेत आणि ते परिपूर्ण केले पाहिजेत व विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन परीक्षा सुद्धा घेतली पाहिजे पण शिक्षकांचा याला पाठींबा मिळणार नाही कारण परीक्षा पद्धती नुसार त्याला सुद्धा बदलावे लागेल व ती पद्दती स्वीकारावी लागेल.

2. प्रचलित परीक्षा पद्दतीत अनेक कालबाह्य पद्धती आहेत वार्षिक परीक्षा,सहामाही परीक्षा इत्यादी. इतर देशात अनेक नवनवे प्रयोग परीक्षा पद्धती बाबत होताना दिसते पण आपण ते स्वीकारत नाही किंवा त्याचे अनुकरण करत नाही व त्यावर संशोधन सुद्धा करीत नाही

आज वेगवेलले प्रयोग परीक्षेसाठी केल्या जात आहे.सतत मूल्यमापन,आकारिक मूल्यमापन,संकलित मूल्यमापन,सात्यत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व त्याही पुढे जाऊन ऑनलाईन मूल्यमापन,ओपन बुक मूल्यमापनआणि ऑन डिमांड मूल्यमापन इत्यादी अस्तित्वात आले .कोणती मूल्यमापन पद्धती वापरायची हे अध्यापनाची कोणती उद्दिष्ट लक्षात घेऊन अध्यापन केले व काय तपासावयाचे यावर अवलंबून असते प्रत्येक पद्धतीचे वैशिष्ठ वेगळे आहे. आज आपणास ऑन डिमांड परीक्षेचा विचार करावयाचा आहे.याचा विचार करतांना परीक्षेतील काही उणीव लक्षात घेऊन करावयाचा आहे. आज धकाधकीच्या जीवनात विद्यार्थी बऱ्याच कार्यात व्यस्त असतो. अर्थार्जनाला प्रमुख महत्व दिल्यामुळे लवकर नोकरी धरणे त्यामुळे शिक्षण कमी राहणे व पर्याय म्हणून दूरशिक्षणाचा पर्याय स्वीकारणे इत्यादी कारणे आपणास दिसून येतात.काही विद्यार्थी नोकरी करून कौश्य विकसित करण्यासाठी शिक्षण प्रशिक्षण घेतात. दुसरी

**महत्वाची बाब म्हणजे तंत्रज्ञानाचा विकास झाला व अध्ययन अध्यापनात त्याचा स्वीकार करण्यात आला. त्या अनुशंगाने परीक्षा सुद्धा ऑनलाईन होऊ घातल्या आहे. विद्यार्थ्यांची अध्ययन शैली,धारणा करण्याची क्षमता,व्यक्ती भिन्नता याचा स्वीकार आपण केलेला दिसतो. त्यामुळेच जर आपण विद्यार्थ्यांची व्यक्ती भिन्नता लक्षात घेतली तर च्या संपादनात विविधता असण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे याचा विचार होणे आवश्यक आहे व यातूनच ऑन डिमांड परीक्षेचा विचार पुढे आला आहे.**

**ऑन डिमांड परीक्षा काय आहे ?**

The On Demand Examination System (ODES) is a Learner-centric Examination System. It allows the learners to take the examination when he/she is ready. Readiness depends on the learner and not on the institution. **ऑन डिमांड परीक्षा प्रणाली (ओडीईएस) एक विद्यार्थी -केंद्रित परीक्षा प्रणाली आहे. ते /ती जेव्हा तयार होतील तेव्हा परीक्षा घेण्याची परवानगी देते. तयारी विद्यार्थ्यांस नव्हे तर संस्थेवर अवलंबून असते.जेव्हा विद्यर्थी परीक्षा देण्यास तयार असतील जेव्हा त्यांचा अभ्यास झाला असे त्याला जाणीव होईल तेव्हा त्याच्या सवडीने परीक्षा देण्यास हि पद्धती विद्यार्थ्यांस मुभा देते. परीक्षा घेण्याची जबाबदारी जरी संबंधित संस्थीची जरी असली तरी परीक्षे करीता प्रश्नत्रिका उपलब्ध करून देणे व त्याचे मूल्यांकन करणे एवढेच कार्य संस्थेची आहे. काही उदाहरणे आपणास सांगता येतील ती खालील प्रकारे.**

National institute of open schooling (NIOS) ODE **ऑन डिमांड ची व्यवस्था उपलब्ध करून देते तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील लष्कर, पोलिस यासह दहा विशेष अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार परीक्षा देता यावी म्हणून 'ऑन डिमांड एक्झाम' पॅटर्न लागू करत आहे . हा पॅटर्न लागू होणार असून, त्यामुळे नोकरीत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येणार आहे. मुक्त विद्यापीठाने परीक्षा पद्धतीतच बदल करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.हे एक धाडसी पाऊलच म्हणावे लागेल.**

**कशी असेल आहे 'ऑन डिमांड एक्झाम'**

**विद्यार्थ्यांना बोर्डाच्या / विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाऊन स्लॉट बुक करावी लागेल. त्यात परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक असेल. त्यानुसार विद्यार्थ्यांना आपल्या सोयीनुसार परीक्षेची तारीख, वेळ, परीक्षा केंद्र निवडावे लागेल. त्यानंतर बोर्ड /विद्यापीठातर्फे परीक्षांचे नियोजन केले जाईल. यशवंराव चव्हाण विद्यापीठातर्फे 'ऑन डिमांड एक्झाम' ही नवीन परीक्षा पद्धती विकसित करण्यात आली असून,येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून त्याद्वारे परीक्षा घेतल्या जाणार आहेत. यात सुरुवातीला विशेष अभ्यासक्रमांसाठीच या पद्धतीद्वारे परीक्षा घेतल्या जातील. त्यात आर्मी, पोलिस यांसह विद्यापीठातर्फे चालविल्या जाणाऱ्या विशेष अभ्यासक्रमांचा समावेश असेल. त्यानुसार संबंधित परीक्षा केंद्रांवर विद्यापीठातर्फे प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका पुरविल्या जातील. त्यानुसार परीक्षा घेतली जाणार आहे. यशवंतराव मुक्त विद्यापीठाने अश्या परीक्षेसाठी २५० केंद्रे सुरू करणार आहे विद्यापीठ प्रारंभी विशेष अभ्यासक्रमांसाठीच या पद्धतीद्वारे**

**परीक्षा घेईल . त्यात आर्मी, पोलिस यांसह विद्यापीठातर्फे चालविल्या जाणाऱ्या विशेष अभ्यासक्रमांचा समावेश असेल. मुक्त विद्यापीठातर्फे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून २०० ते २५० नवीन अभ्यासक्रम केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत असे विद्यपीठाने जाहीर केले आहे .**

**निष्कर्ष**

**ऑन डिमांड परीक्षा मध्ये कोणत्याच प्रकारचा अडथळा असणार नाही आहे.विद्यार्थी आपल्या सवडीनुसार कुठेही,केव्हाही,त्याला वाटेल तेव्हा तयारीनुसार त्याला परीक्षा देता येईल विद्यर्थ्याचा जो विषय निवडायचा आहे तो निवडू शकेल वेळापत्रक प्रमाणे, विशिष्ट वेळेत, विशिष्ट तारखेस पेपर द्यव्याचा याचे दडपण राहणार नाही. अश्या परीक्षेमुळे येणार तणाव,दडपण नैराश्य,भीती कमी होऊ शकेल. अश्या परीक्षेमुळे वेळेत परीक्षेचा निकाल लागावा याची वाट बघावे लागणार नाही. महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे "विद्यार्थ्यांची सवड" होय**

**संदर्भ**

https://comosaconnect.org/on-demand-examination-system-odes-of-nios/

https://www.nios.ac.in/on-demand-examination.aspx

https://www.quora.com/What-is-On-demand-Examination-in-NIOS-of-12th-class

https://comosaconnect.org/on-demand-examination-system-odes-of-nios/

https://www.ycmou.ac.in/